

नमस्कार !!

सर्व कुलबांधव आणि भगिनींना मराठे प्रतिष्ठानचे विश्र्वस्त, कार्यकारी मंडळातील सदस्यांकडून तसेच व्यक्तिशः माझ्यातर्फे हिंदु नववर्षाच्या मनःपुर्वक हार्दिक शुभेच्छा.

दिवाळीच्या पाडव्यानिमित्त आपल्या सोबत संवाद साधला होता. ६ नोव्हेंबरला आपली वार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूक झाली. यांत नवीन नेमणूका झाल्या, विशेषतः युवक आणि वयस्कर असा समतोल राखला गेला.

## नवीन सभासद वृध्दी आणि हितगुज:

सभासद वाढीचा वेग गेल्या दोन वर्षांत कमी झाला आहे. या काळातील परिस्थिति लक्षात घेता ते स्वाभाविकच होतं. मात्र आता बदलत्या परिस्थितीत यात सुधारणा अपेक्षित आहे. सभासदत्वाची रक्कम आपण प्रतिष्ठानच्या बँक खात्यात थेट भरू शकता. यासाठीच्या माहितीसाठी कोषाध्यक्ष अनंत मराठे यांच्याशी 9833944913 या भ्रमणध्वनीवर संपर्क करावा. पैसे भरल्यावर त्याविषयीची सूचना, भरलेली रक्कम, स्वतःचे नाव आणि पत्ता आणि रक्कम के कारणाने भरली ते कारण याची माहिती त्यांना कळविल्यास त्याची रीतसर पावती पाठवणे सुकर होईल. सभासदांसमवेत संवाद साधत आपली सभासद यादी अधयावत करणे, सभासदांचे ई-मेल आय डी तसेच WhatsApp नंबर घेणे व त्याद्वारे संपर्क साधणे हीच बदलत्या परिस्थितीची गरज आहे. कारण सध्य परिस्थितीत पत्र पाठवले तरी ते मिळेलच याची शाश्वती नाही. या कारणानेच गेली जवळजवळ तीन वर्षे आपण हितगुज हे आपले त्रैमासिक आपल्या मराठे प्रतिष्ठानच्या marathepratishthan.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करीत आहोत. तसेच प्रतिष्ठानच्या WhatsApp समूहातील सर्व सदस्यांना हितगुजचे सर्व अंक PDF स्वरूपात उपलब्ध करीत आहोत. ज्या ८/१० **सभासदांना** ह्या प्रकारे 'हितगुज'चा आस्वाद घेणे शक्य होत नाही, त्यांच्यासाठी छायाप्रत काढून देण्याची व्यवस्था केली आहे. हितगुज च्या प्रकाशनातील सातत्य राखण्यासाठी सभासदांचे साहित्य सतत उपलब्ध होणे आवश्यक आहे ही सर्वमान्य गोष्ट आहे. त्याकारणाने विविध विषयांवरील आपले साहित्य संपादिका डॉ. सौ. सुमेधाताई मराठे यांच्याकडे किंवा hitguj@marathepratishthan.org या ई-मेल आयडी वर पाठवावे ही कळकळीची विनंती. हितगुजचे सर्व अंक निर्धारित वेळेत प्रकाशित करण्यासंबंधित व्यक्तिशः माझा तसेच संपादिका यांचा प्रयत्न असेल.

## आर्थिक मदत:

आपल्या सभासदांस तसेच आपल्या मराठे कुळातील व्यक्तींस आपण वैधकीय तसेच शैक्षणिक मदत देत असतो. अशी मदत आर्थिक निकषावर अवलंबुन असते. अशा मदतीविषयीची माहिती पूर्णपणे

गोपनीय राखली जाते. त्यामुळे गरजू व्यक्तींनी निश्चिंतपणे कार्यवाह श्री. हेमंत यांचेसोबत संपर्क साधावा. प्रतिष्ठानच्या आर्थिक स्थितीनुरूप यथाशक्ति मदत नक्कीच केली जाईल. मात्र आर्थिक निकष काटेकोरपणे पाळूनच!

## कुलवृत्तांत संगणकीकरण:

गेले बरेच महिने कुलवृत्तांत समिती आपल्या मराठे कुलवृत्तांताच्या संगणकीकरणाचे काम करीत आहे. आलेल्या अनेक अडचणींना यशस्वीपणे तोंड देऊन हा प्रकल्प आता पूर्णतेच्या मार्गावर आहे. हे यश कुलवृत्तांत समितीचे अध्यक्ष श्री श्रीनिवास, आणि या प्रकल्पाशी संबंधित इतर सदस्य सौरभ (पुणे), शशांक (बेळगावी), प्रसाद आणि प्रदीप (गोवा), कार्य कारिणी आणि विश्वस्त मंडळाचे बहुतेक सदस्य आणि समन्वयक म्हणून कार्य करण्याची तयारी दर्शविलेले ५/७ सभासद यांचे आहे. संगणकीय कामाचा अनुभव असलेल्या (Computer savvy) तरुण व्यक्ति ज्यांना ADMIN या नात्याने काम करण्याची इच्छा असेल त्यांनी श्री. श्रीनिवास यांच्याशी 8425886468 या प्रतिष्ठानच्या भ्रमणध्वनी वर अवश्य संपर्क साधावा. अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर सर्व कुल बांधवांसाठी आपापली माहिती भरणे आणि त्या प्रणालीतील वंशावळी आणि उपलब्ध माहितीचे विश्लेषण या आणि इतर सुविधा वापरणे शक्य होईल. या विषयी विस्तृत माहिती येत्या काही दिवसांत याच ठिकाणी प्रसिध्द करण्यात येईल.

## कुलसंमेलन:

२०१८ साली बडोदा येथे आपले संमेलन झाले. त्यानंतर आलेल्या कोविड महामारीमुळे संमेलन घेणे शक्य झाले नव्हते. परंतु आता परिस्थिती सुधारली आहे. या बाबतीत कणकवली किंवा कोकणातील इतर ठिकाणच्या व्यक्ती पुढाकार घेण्यासाठी पुढे याव्यात अशी अपेक्षा आहे. कुलसंमेलनासाठी केवळ समर्पित आणि स्वेच्छा वृतीने कार्य करणा-या मनुष्यबळाची आवश्यकता असते. आर्थिक गरज उपस्थित व्यक्तींच्या शुल्कातून बहुशः भागते. ते शक्य न झाल्यास प्रतिष्ठान थोडाफार आर्थिक भार घेऊ शकते हे जाणून या बाबतीत तयारी असणा-या व्यक्तींनी आपल्या विभागात संमेलन घेण्याच्या तयारीसाठी कार्यवाह श्री.हेमंत यांच्याशी संपर्क साधावा.

## गुणवत्ता पारितोषिके:

सध्या १०वी १२ वी च्या परीक्षा सुरु आहेत किंवा संपल्या असतील. त्यांचे निकाल जाहीर झाल्यानंतर जे उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाले असतील त्यांनी आपली गुणपत्रिका प्रतिष्ठानच्या admin@marathepratishthan.org या ई-मेल वर पाठवून दिल्यास गुणवत्तेनुसार त्यांचा विचार परितोषिकांसाठी करता येईल. पारितोषिके या वर्षीच्या वार्षिक सभेत दिली जातील. जे विद्यार्थी उपस्थित राहू शकणार नाहीत त्यांना बक्षिसांच्या रकम NEFT ने पाठविण्यात येतील. मात्र स्थानिक विद्यार्थी या समारंभास उपस्थित राहिल्यास ते स्वागतार्ह आहे.

## प्रतिष्ठानचे उपक्रम:

या चैत्र महिन्यापासुन आपले सण उत्सव चालु होतील. प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षीदेखील घरगुती गणेशोत्सव स्पर्धा घेण्यात येईल. त्यामध्ये अधिकाधिक कुलबांधवांनी भाग घेऊन ती यशस्वी करावी असे मी आवाहन करीत आहे.

कुटुंबातील व्यक्तीचे निधन ही अत्यंत दुःखदायक घटना असते. केवळ त्या कुटुंबासाठीच नव्हे तर आपल्या विस्तृत मराठे परिवारासाठी देखील! या कारणाने वर्षभर त्या कुटुंबात सण साजरे होत नाहीत. आपल्या हिंदू परंपरेला अनुसरून, मराठे प्रतिष्ठानने गेली २ वर्षे अशा कुटुंबांना दिवाळी फराळ पाठवण्याची प्रथा सुरू केली आहे. त्यामुळे आपल्या कुटुंबातील गेल्या वर्षभरातील (विजयादशमी ते विजयादशमी) अशा  घटनेची माहिती आम्हाला वरील ई-मेल वर किंवा कार्यवाह श्री.हेमंत यांना 9822847120 या भ्रमणध्वनीवर पाठवावी. ही माहिती आपल्या 'हितगुज' या मुखपत्रात सहवेदना या सदरात देखील प्रसिध्द केली जाते.

## कायदेशीर बाबीची पूर्तता:

गेले काही महिने आयकर तसेच धर्मादाय आयुक्तालय संबंधातील कायद्यांत सातत्याने बदल होत आहेत. त्यांचे पालन आम्ही समर्थपणे करीत आहोतच. मात्र नवीन नियमांनुसार देणगीदार व्यक्तींनी देणगी संदर्भात एक घोषणापत्र (Declaration) देण्याची तसेच आपला PAN नंबर देण्याची आवश्यकता आहे. प्रतिष्ठानला आयकर कायदा 80G चे registration प्राप्त झाल्याने अशा देणग्यांवर मिळणारी करसवलत दात्याला मिळू शकेल आणि त्याच्या AIS विवरणात ती दिसू शकेल. या सवलतीचाचा लाभ आपले कुलबांधव घेतील ही खात्री आहे.

मी पुनः एकदा आपल्या सर्व सभासदांस तसेच कुलबांधव व भगिनींना हिंदु नववर्षाच्या शुभेच्छा देतो आणि सर्वांना उतम आरोग्य धनसंपदा लाभो हीच सदिच्छा व्यक्त करतो.

आपला

विजय विष्णु मराठे
अध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान